जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 OCT 2022

सकाळ


# 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स'मध्ये ८० संशोधक

कोल्हापूर, ता. २१ : 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स'तर्फे नुकत्याच जाहीर झालेल्या 'वर्ल्ड सायंटिस्ट ॲण्ड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२३'मध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह एकूण ८० संशोधक-प्राध्यापकांचा समावेश झाला आहे.

शिवाजी विद्यापीठास देशातील ११०३ शैक्षणिक संस्थांच्या यादीत देशात २५ वे स्थान मिळाले आहे. यादीत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा एच-इंडेक्स हा सर्वाधिक म्हणजे ७९ इतका आहे.

एडी सायंटिफिक इंडेक्समध्ये शास्त्रज्ञांच्या संशोधनातील कामगिरी, वैयक्तिक वैज्ञानिक उत्पादकतेच्या अतिरिक्त मूल्यावर आधारित क्रमवारी आणि विश्लेषण करण्यात आले आहे.


डी. टी. शिर्के


पी. एस. पाटील

> ए.डी. सायंटिफीक इंडेक्स क्रमवारीत शिवाजी विद्यापीठाचे गतवर्षी ४८ संशोधक होते. ही संख्या दुप्पट झाली आहे. विज्ञान विषयांव्यतिरिक्त विद्याशाखांमधील संशोधकांचाही समावेश झाला आहे. सर्व संशोधकांच्या कामगिरीचा अभिमान वाटतो.
> – डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

**यादीत स्थान मिळालेले अन्य संशोधक असे** : डॉ. एस. पी. गोविंदवार, केशव राजपुरे, सी. एच. भोसले, अण्णासाहेब मोहोळकर, ज्योती जाधव, के. एम. गरडकर, संजय कोळेकर, अनिल घुले, एस. डी. डेलेकर, राजेंद्र सोनकवडे, एन. आय. तरवाळ, जी. बी. कोळेकर, विजया पुरी, एस. आर. सावंत, तुकाराम डोंगळे, प्रमोद वासंबेकर, राजेश्री साळुंखे, एम. बी. देशमुख, के. डी. सोनवणे, टी. जे. शिंदे, जॉन डिसूझा, गजानन राशिनकर, दिलीप दगडे, एस. बी. सादळे, मानसिंग टाकळे, पी. डी. राऊत, अशोक गडकरी, ए. के. साहू, संतोष पायघन, निखिल गायकवाड, किशोर कुचे, एम. व्ही. सांताकुमार, आर. आर. मुधोळकर, पी. बी. दंडगे, राहुल रणवीर, दत्तात्रय गायकवाड, किरणकुमार शर्मा, नीरज राणे, पंकज पवार, नीलम डिगे, टी. व्ही. साठे, एन. आर. प्रसाद, अनंत दोड्डमणी, उत्कर्ष मोरे, एन. एस. चव्हाण, एस. जी. घाणे, सतीश पाटील, सोनल चोंदे, विजय कोरे, एस. एस. कांबळे, निरंजना चव्हाण, सुहास कदम, क्रांतिवीर मोरे, आर. व्ही. गुरव, एस. आर. यंकंची, आसिफ तांबोळी, व्ही. ए. सावंत, चेतन आवारे, शशीभूषण महाडिक, सचिन पन्हाळकर, एम. एम. डोंगरे, संभाजी शिंदे, कबीर खराडे, प्रयागराज फांदीलोलू, एम. पी. भिलावे, हेमांगी कुलकर्णी, नितीन कांबळे, सुरेश सूर्यवंशी, जयवंत पाताडे, मिलिंद सुतार, मेधा नानिवडेकर, इराण्णा उडचण, कविता ओझा, एस. एम. गायकवाड, पी. एस. कांबळे, विनायक गावडे.

22 OCT 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘विधी’च्या विद्यार्थ्यांचीही दिवाळी गोड...

## सर्व पॅटर्नला ३५ गुणांचे पासिंग; दै. ‘पुढारी’च्या बातमीचा परिणाम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने मार्च-एप्रिलमध्ये घेतलेल्या विधी शाखेच्या परीक्षेअंतर्गत विविध पॅटर्नच्या पासिंगमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अडचणीत सापडले होते. याबाबत दै. ‘पुढारी’मध्ये वृत्त प्रकाशित झाले. विद्या परिषदेच्या बैठकीत १००, ८०/२० व ७०/३० पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना ३५ गुणांच्या पासिंगचा निर्णय झाला. याचा ५५० हून अधिक विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे. या निर्णयाने ‘विधी’च्या विद्यार्थ्यांचीही दिवाळी गोड झाली आहे.

विद्यापीठामार्फत यूजीसी व शासन नियमांच्या आधारे ‘विधी’चा अभ्यासक्रम राबविला जातो. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यात सात विधी पान १२ वर ▸



दै. ‘पुढारी’ने प्रसिद्ध केलेले वृत्त.

## ‘विधी’च्या विद्यार्थ्यांचीही दिवाळी गोड...

**(पान १ वरून)** महाविद्यालयांत दोन हजार विद्यार्थी शिकत होते. विधी अभ्यासक्रमामध्ये ७०/३०, ८/२० व १०० असे पॅटर्न राबविण्यात येतात. परंतु, त्यांचे पासिंग वेगवेगळे होते. विद्यापीठाच्या या निर्णयामुळे १०० पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना पासिंग ५० टक्के गुण असल्यामुळे अनेक विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. दै. ‘पुढारी’च्या १८ रोजीच्या अंकात ‘‘विधी’चा अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका एक.. मात्र पासिंग वेगवेगळे का?’ अशी बातमी प्रसिद्ध झाली. त्यानंतर विद्यापीठाने कमिटी स्थापन केली. १४ ऑक्टोबर रोजी कमिटीची बैठक झाली. त्यानंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली २० ऑक्टोबर रोजी विद्या परिषदेची बैठक झाली. यात विधी शाखेच्या सर्व विद्यार्थ्यांचे पासिंग ३५ गुणांचे करण्याचा निर्णय झाला.


> विधी शाखेच्या वेगवेगळ्या पॅटर्नमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत होते. याबाबत विद्यापीठ प्रशासनास निवेदन देऊन पासिंग निकषांत बदल करावा, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली होती. त्यास यश आले आहे. कुलगुरू व परीक्षा संचालकांनी तत्काळ हा विषय मार्गी लावला. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान टळले आहे.
>
> **- प्रदीप माकने,** प्रतिनिधी, विधी शाखा विद्यार्थी कृती समिती

जनसंपर्क कक्ष
22 OCT 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गावे स्वावलंबी झाल्यास देश समृद्ध

## पोपटराव पवार ; शिवाजी विद्यापीठ रुरल डेव्हलपमेंट विभागातर्फे व्याख्यान

कोल्हापूर, ता. २१ : जाती-पातीपलीकडे जात गावात विविध योजना राबवत कामे केली तर गावात कितीही गट-तट असले तरी ग्रामविकास साधता येतो, असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी येथे केले. देशातील गावे जोपर्यंत स्वावलंबी होत नाहीत, तोपर्यंत देश स्वावलंबी आणि समृद्ध होणार नाहीत, असेही ते म्हणाले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बोलताना पोपटराव पवार.**

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागातर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. त्यांनी व्यसनाधीनता, पर्यावरणविषयक, धार्मिक, शास्त्रीय, क्रीडाविषयक, ग्रामविकासाच्या विविध माध्यमांच्या विविध विषयांना स्पर्श केला. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील अध्यक्षस्थानी होते.

श्री. पवार म्हणाले, 'शेतीतील बदलासह वसुंधरा वाचवण्यासाठी जलसंधारणही महत्त्वाचे आहे. तरुणाईत जग बदलण्याची क्षमता असून, तरुणाईला योग्य दिशा दिली गेली तरी ग्रामविकास व विकास शक्य आहे.' तंत्रज्ञानाचा वापर करत त्यांनी हिवरे बाजार ग्रामविकासाचे चित्र उपस्थितांसमोर उभे केले. उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.

डॉ. नीलम जाधव यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय दिला. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागाचे प्रभारी संचालक डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. समाजकार्य विभागाच्या सौरभ धनवडे यांनी सूत्रसंचालन केले. संध्या कांबळे यांनी आभार मानले.

22 OCT 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इस्लामपूरचे कन्या महाविद्यालय अजिंक्य

## शिवाजी विद्यापीठ आंतर विभागीय महिला कबड्डी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतर विभागीय महिला कबड्डी स्पर्धेत इस्लामपूरच्या के.आर.पी. कन्या महाविद्यालय संघाने अटीतटीच्या सामन्यात कोल्हापूरच्या शहाजी महाविद्यालयाचा पराभव करून अजिंक्यपद पटकावले. महावीर महाविद्यालयाच्या संयोजनाखाली ही स्पर्धा 'कबड्डी राव अॅकॅडमी' येथे नुकतीच झाली.

स्पर्धेचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे, प्रा. संभाजी पाटील यांच्या उपस्थितीत झाले. शिवाजी विद्यापीठांतर्गत कोल्हापूर, सातारा, सांगली येथील प्रत्येकी प्रथम चार संघ असे एकूण १२ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत आंतर विभागीय महिला कबड्डी स्पर्धेत विजेत्या कन्या महाविद्यालय इस्लामपूर संघास चषक देताना मान्यवर.**

अंतिम सामन्यात सुरुवातीस शहाजी महाविद्यालयाने कन्या महाविद्यालयावर वर्चस्व राखले. पूर्वार्धात १० गुणांनी पिछाडीवर असलेल्या कन्या महाविद्यालयाच्या संघाने उत्तरार्धात मात्र चढाई व क्षेत्ररक्षण यामध्ये जोरदार मुसंडी मारली.

अण्णासाहेब डांगे महाविद्यालय हातकणंगले संघाने आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज आष्टा संघावर एकतर्फी मात करून स्पर्धेत तिसरा क्रमांक पटकावला. या स्पर्धेतून अमरावती येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या महिला संघाची प्राथमिक निवड करण्यात आली. यासाठी डॉ. बाबासो उलपे डॉ. लीना पाटील व डॉ. संजय पाटील यांनी काम पाहिले.